MHGA010008752022

सत्र खटला क्र. ९५/२०२२
सरकार विरुध्द
नरेश गेडेकर व इतर एक

निशाणी ०३ वरील आदेश
(दि.१५/०५/२०२३)

१. अर्जदार/आरोपी क्र.२ ललीताबाई देवराव गेडेकर हिने कलम ४३९ फौजदारी प्रक्रिया संहितेप्रमाणे गडचिरोली पोलीस स्टेशन येथील गुन्हा क्र. ४८२/२०२२ कलम ३०२ सहकलम ३४ भा.द.वि. अन्वये नोंद असलेल्या गुन्हयामध्ये जामीन मिळणेसाठी अर्ज दिला आहे. तिला दि.७.७.२०२२ रोजी अटक केली. ती पुलखल, ता. व जि.गडचिरोली येथील स्थायी रहिवासी आहे. तिला संशयाच्या आधारावर गुंतविण्यात आले आहे. अर्जदार/आरोपीला जामीनावर सोडल्यास ती कोठेही पळुन जाणार नाही. पोलीसांचा तपास पुर्ण झाला असल्याने न्यायालयीन कोठडीची आवश्यकता नाही. तसेच आरोपीकडुन कोणत्याही प्रकारची जप्ती शिल्लक नाही. न्यायालय ज्या अटी व शर्ती लावेल त्याचे पालन करण्यास ती तयार आहे. करीता अर्जदार/आरोपीला नियमीत जामीन मंजुर करण्यात यावा.

२. सरकारी अधिवक्ता यांनी अर्जास त्यांचे लेखी म्हणणे नि.क्र.४ नुसार दिले की, फिर्यादीचा मोठा भाउ कैलाश मेश्राम याचे लग्न तीन वर्षापुर्वी भारती बावणे हिचे सोबत झाले. फिर्यादीची वहिणी भारती हिचे लग्नानंतर दोन ते तीन महिण्यांनी तीचे गावातील नरेश गेडेकर सोबत अनैतिक संबंध असल्याची माहिती झाली. कैलास मेश्राम याने भारती व नरेश यांना आनंदराव ठाकरे यांचे शेतात एकत्र पकडले व त्यांना दोघांना पकडुन घरी आणले त्यावेळी फिर्यादीचा भाउ व नरेश गेडेकर मध्ये भांडण झाले. कैलास हा भारतीला ठेवण्यास तयार नसल्याने ती माहेरी तिचे आईवडीलांसोबत मौजा सुशी दाबगाव येथे निघुन गेली.

दि.५.७.२०२२ रोजी फिर्यादी हे मौजा नवेगाव येथे काम करीत असतांना सायंकाळी ६.०० वाजताचे दरम्यान कालीदास गेडाम यांनी मोबाईलवर फोन करुन ते घरी आल्यावर त्याला सांगितले की कैलास हा कनेरीकडे जाणा—या रोडलगत असलेल्या विजय रोडे याचे शतामध्ये जाणा—या पांदन रोडवर रक्ताच्या थारोळयात पडला असुन गावातील नरेश गेडेकर याने जुन्या वादातुन कैलास यास फावडयाने, दगडाने व काठीने मारहाण केली. फिर्यादी हे विजय रोडे याचे शेतात गेले तेव्हा कैलास हा रक्ताच्या थारोळयात निपचीत पडलेला होता व त्याची हालचाल होत नव्हती. नरेश गेडेकर याने कैलास यास जिवानीशी ठार केल्यामुळे फिर्यादीने पोलीस स्टेशन गडचिरोली येथे रिपोर्ट दिली.

३. सदर रिपोर्टवरुन अप.क्र.४८२/२०२२ कलम ३०२ भादवी अन्वये गुन्हा नोंद करुन तपासात घेतला. सदर अर्जदार/आरोपी क्र.२ चा गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने गुन्हयात कलम ३४ भादवी अन्वये वाढ करण्यात आली.

४. आरोपी क्र.१ व २ ने संगनमत करुन गंभीर स्वरुपाचा गुन्हा केलेला आहे व सदर मामला न्यायप्रविष्ठ असुन अशा परिस्थीतीत आरोपी/अर्जदाराला जामीन मंजुर झाल्यास आरोपी ती मा.न्यायालय ज्या ज्या वेळी आदेश करेल त्या त्या वेळी हजर न राहण्याची शक्यता आहे. तसेच आरोपी, मृतकाचे नातेवाईक व साक्षीदार हे एकाच गावातील असल्याने आरोपीला जामीन मिळाल्यास ती आरोपी आणि सहभागी आरोपीकडुन साक्षदारांवर दबाव टाकण्याची, मयताचे नातेवाईकांना साक्ष देण्यापासुन परावृत्त करण्याची व आरोपीच्या हातुन पुन्हा असेच कृत्य घ ाडण्याची शक्यता नाकारता येत नाही. करीता, अर्जदाराचा जामीन अर्ज नामंजुर करण्यात यावा.

५. गुन्हयाची हकीकत अशी की, फिर्यादीच्या वहीनीसोबत आरोपी क्र.१ १ चे अनैतिक संबंध असल्याने व मृतक कैलास याने त्याची पत्नी व आरोपी क्र.१ ला शेजारील शेतशिवारात एकत्र पकडल्याने आरोपी व मृतक यांचेमध्ये झगडा होवुन मृतक याने त्याची पत्नी व आरोपी यांना तंटामुक्ती समिती यांचेसमोर हजर

केल्याचे कारणावरुन आरोपी याने त्याचा राग मनात धरुन मयताचे डोक्यात फावडयाने, दगडाने व काठीने मारुन जिवानीशी ठार केले अशा फिर्यादीच्या तोंडी रिपोर्टवरुन सदरचा गुन्हा अप.क्र.४८२/२०२२ कलम ३०२ भादवी अन्वये नोंद करुन तपासात घेतला. प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांचे बयाणावरुन अर्जदार/आरोपी क्र. २ हिचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने गुन्हयात सहकलम ३४ भादवी वाढ करुन तिला गुन्हयात अटक करण्यात आली.

६. अर्जदारातर्फे वकीलांनी असा युक्तीवाद मांडला की, तक्रारमध्ये आरोपी क्र.२ च्या नावाचा उल्लेख नाही तसेच पोलीसांनी चौकशी दरम्यान ज्या दोन स्त्री साक्षीदारांचा पोलीस बयान घेतले त्यात एकीने घटना ऐकीव असल्याचे सांगितले तर दुसरीने आरोपी क्र.२ ने आरोपी क्र.१ ला लांबुन मारा मारा असे म्हणुन उत्तेजित केले. परंतु तीने प्रत्यक्षात मृतकाला कोणतीही ईजा केलेली नाही.

७. पुढे युक्तीवादात असे सुध्दा नमुद करण्यात आले की, अर्जदार ही वयस्कर महिला असुन तीने गुन्हयात प्रत्यक्षात कोणतीही घटना केलेली नाही तसेच तपास पुर्ण होवुन दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. त्यामुळे अर्जदार हिला शर्ती व अटींच्या आधारे जामीन मंजुर करण्यात यावा अशी विनंती करण्यात आली.

८. सरकारी वकीलांनी अर्जास विरोध करतांना असे आवर्जुन नमुद केले आहे की, आरोपी क्र.१ हे आरोपी क्र.२ चा मुलगा असुन आरोपी क्र.१ चे फिर्यादीच्या वहीनीशी अनैतिक संबंध असल्याने आरोपी क्र.१ कडे मृतकाचा खुन करण्याचा उद्देश होता. घटना घडत असतांना अर्जदार हिने आरोपी क्र.१ ला मारा मारा म्हणुन त्याला उत्तेजित करतांना महिला साक्षीदार अपीला आणि शारदुबाई यांनी बघितलेले आहे. अर्जदार हिला जामीन दिल्यास ती प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांच्यावर दबाव आणण्याची शक्यता नाकारता येणार नाही. अशा परिस्थीतीत अर्जदार हिचा जामीन अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती करण्यात आली.

९. अपीला हिचे पोलीस बयानामध्ये पोलीसांनी तीला तुमच्या गावात

कोणाची झगडाभांडण झाले आहे का अशी विचारपुस केली तेव्हा तिने कोणाला काही सांगितले नाही. परंतु तिला कैलास याचा खुन झाल्याचे समजले. त्यामुळे अपीला हिचे पोलीसांनी घेतलेले बयान हे ऐकीव स्वरुपाचे आहे असा जो अर्जदारातर्फे युक्तीवाद मांडण्यात आला त्यात तथ्य दिसुन येते.

१०. शारदुबाई हिचे पोलीसांनी बयान नोंदविले. त्यात तिने असे सांगितले की ती शेतात जात असतांना तिला आरोपी क्र.१ व २ हे कैलास याचेशी वाद करत असतांना दिसले. त्यानंतर नरेश व कैलास यांच्या झटापटी झाल्या. ललीता ही नरेशला मार मार असे म्हणत होती. परंतु ती सुध्दा घाबरुन गेल्याने तीने कोणाला काहीही न सांगता घरी गेल्याचे सांगितले. मुळात घटना घडल्यानंतर पोलीस चौकशीला आले असतांना अपीला व शारदुबाई यांनी पोलीसांना प्रत्यक्ष घटना बघितली असे सांगितले नाही. त्यामुळे त्या दोन साक्षदारांवर या घडीला विश्वास ठेवणे योग्य होणार नाही.

११. एकुणच तक्रार नोंदवितांना आरोपी क्र.२ चा गुन्हयात सहभाग असल्याचा उल्लेख केलेला नाही, परंतु आरोपी क्र.२ ने आरोपी क्र.१ ला मार मार असे म्हणुन उत्तेजित केल्याने तिला या गुन्हयात सह आरोपी करण्यात आलेले आहे. मुख्य म्हणजे सदोष मनुष्यवधाकरीता एकुण पाच बाबी महत्वाचे असतात.

१. एक मनुष्य दुस–या मनुष्यास ठार करतो.

२. त्याकरीता काही कृती करतो.

३. या कृतीमागे इरादा असतो अगर

४. अरोपीस जाणीव असते, अगर

५. केलेली शारिरीक दुखापत मृत्यू घडविते.

१२. दोषारोपपत्राचे अवलोकन केले असता वरीलपैकी कोणतीतरी एक बाब आरोपी क्र.२ ने करणे गरजेचे होते. परंतु तसे केल्याचा कोणताही पुरावा तपासणी अधिका–याने गोळा केलेला नाही. अशा परिस्थीतीत अर्जदार हिला गजाआड ठेवणे योग्य होणार नाही. सरकारी वकीलांनी यातील दोन साक्षीदार प्रत्य क्षदर्शी असल्याने जामीन देण्यात येवु नये असा युक्तीवाद मांडला परंतु

साक्षदारांना सुरक्षा देणे हे पोलीसांचा कर्तव्याचा एक भाग ठरतो व त्याकरीता सन २०१७ मध्ये कायदा सुध्दा करण्यात आलेला आहे. अशा परिस्थीतीत अर्जदार हिचा जामीन मंजुर करणे न्यायोचित होईल. करीता खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्जदार/आरोपी ललीताबाई देवराव गेडेकर हिला गडचिरोली पोलीस स्टेशन येथील गुन्हा क्र.४८२/२०२२ कलम ३०२, सहकलम ३४ भा.द.वि. मध्ये जामीन मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार हिने रक्कम रु.५०,०००/— जात मुचलक्याची(P.R. Bond) व तेवढयाचा रकमेचा एक जामीन(Surety) देण्यात यावा.

३. अर्जदार हिने साक्षदार अपीला पद्माकर पालकर व शारदुबाई रुषीजी वागधरे यांच्यावर दबाव आणु नये व ईतर प्रकारचा कोणताही गुन्हा करु नये.

४. साक्षदार संरक्षण कायदयाप्रमाणे अपीला व शारदुबाई यांना आवश्यकता वाटल्यास पोलीसांनी त्यांची साक्ष नोंदवेपर्यंत संरक्षण दयावे.

५. अभियोग पक्षाने प्रकरण जलद गतीने निकाली काढण्याकरीता न्यायालयाला सहकार्य करावे.

Ravishankar Namdeorao Bawankar

Digitally signed by Ravishankar Namdeorao Bawankar
Date: 2023.05.15 13:42:51 +0530

गडचिरोली.
दि. १५/०५/२०२३

(र. ना. बावनबर),
अतिरिक्त सत्र न्यायाधीश
गडचिरोली.